# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थप्रशासन विभाग

---

## परिपत्रक

जा.क्र. अप्रवि/सेवार्थ/1477/2013 दिनांक :–18/10/2013

विषय :– एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये वेतन देयके निर्गमित करण्याबाबत.

संदर्भ :– 1. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012/प्र.क्र. 169/8–अे, दि. 23.11.2012

2. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012/प्र.क्र.169/8–अे दि. 01.10.2013

या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी तसेच वेतन लेखा अधिकारी, अकोला/नागपूर यांना कळविण्यात येते की, **ऑक्टोंबर 2013 चे वेतन देय नोव्हेंबर 2013** सदर वेतन एसएयु सेवार्थ प्रणालीमधून निर्गमित करावयाचे आदेश संदर्भ क्र. 1 नुसार करण्यात आलेले आहे.

कार्यालयातील उपलब्ध संगणक साधनसामुग्रीव्दारे किंवा खाजगी संगणक केंद्रामधून एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये ऑक्टोंबर 2013 चे देय नोव्हेंबर 2013 वेतन निर्गमित करून घेण्यात यावेत. सदर वेतन संदर्भ क्र. 2 नुसार (Offline) पारंपारीक पध्दतीने निर्गमित करावयाचे असले तरी संबंधित वेतन व लेखाधिकारी यांनी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी/कर्मचारी यांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीत विहीत महिण्याचे काढलेले असेल तरच पारंपारिक पध्दतीने वेतन पारीत करावे. याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. जर यामध्ये काही तांत्रीक अडचण येत असल्यास, तसे संबंधित आहरण व संवितरण अधिका–याकडून लेखी स्वरूपात अडचण स्विकारावी. परंतु संबंधित वेतन देयक एसएयु सेवार्थ प्रणालीमध्ये तयार केल्याशिवाय वेतन देयके पारीत करू नये.

याबाबत संबधित आहरण व संवितरण अधिकारी वेतन व लेखाधिकारी अकोला/नागपूर यांना व्यक्तिशः जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. जेणेकरून या विद्यापीठाचे एकत्रित देयक शासनाकडे तपासणीसाठी सादर करणे शक्य होईल.

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रतिलीपी :-

1. **मा. कुलगुरू,** डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे स्विय सहाय्यक यांना माहीतीसाठी सविनय सादर.
2. **मा. कुलसचिव**, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीतीसाठी
3. श्री. सुनिल व्यास, मा. सहसंचालक (सुधारणा) लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मंत्रालयासमोर, मुंबई.
4. श्री. प्रदोष मनेकर, ॲक्सेचर कंपनीचा प्रतिनिधी यांना टीसीएस कंपनी योग्य माहीतीसाठी सविनय सादर
5. वित्त सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भोसले नगर, पुणे.
6. वेतन व लेखाधिकारी, अकोला/नागपूर यांनी आपल्या अधिनस्त असलेले सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांचे वेतन देयक एसएयु सेवार्थ प्रणालीत विहीत कालावधीचे वेतन देयक तयार झाले किंवा नाही याची खात्री केल्यावरच संबंधित वेतन देयक पारीत करावे.
7. सर्व आहरण व संवितरण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.